**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक. १/२००७ मधील नि. १३४ व नियमित दिवाणी मुकदमा क्र. १३९/२०१२ मधील नि. ४३ वरील संयुक्त आदेश**

दावा क्रमांक १/२००७ हा सरस निरस वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे. तर, दावा क्रमांक १३९/२०१२ हा आज्ञार्थी ताकीदीकरीता दाखल करण्यात आला आहे. दावा क्रमांक १/२००७ मध्ये वादींचा पुरावा संपला असून प्रतिवादींचा पुरावा सुरु झाला आहे. दावा क्रमांक १३९/२०१२ मध्ये देखील पुरावा सुरु झाला आहे.

०२. या प्रकरणी वर नमूद केलेले अर्ज वादींतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी याकरीता दाखल करण्यात आलेले आहेत. त्यांचे असे कथन आहे की, दावा मिळकत सर्व्हे क्र. ३४ हिस्सा क. २० ही मिळकत वादी व प्रतिवादी क्र. १ ते ७ यांची वडीलोपार्जित सामाईक मालकी वहिवाटीची आहे. मात्र सदर मिळकतीच्या अधिकार अभिलेखात फेरफार नोंद क्रमांक ८४०३ या नोंदीने वादीचे वडील पांडुरंग उमाजी मयेकर यांचे एकटयाचे नांव दाखल झाल्याने सदरची मिळकत ही त्यांच्या एकटयाच्या मालकीची असल्याचा वादींचा गैरसमज झाला आणि त्यामुळे दावा मिळकतीबाबत हक्कस्थापनेची दाद मागून त्या अनुषंगाने चुकीचे वादकथन करण्यात आले. परंतु, आता वादींना वस्तुस्थितीची जाणीव झाल्याने दाव्यात दुरुस्ती करणे भाग पडले आहे. त्यामुळे सदरचे अर्ज देण्यात आले आहेत.

०३. सदरच्या अर्जांना प्रतिवादींतर्फे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. त्यांचे असे कथन आहे की अर्जांना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ मधील परंतुकाची बाधा आहे. तसेच त्यांचे पुढे असे कथन आहे की पुर्वी अशा प्रकारची दुरुस्ती का करण्यात आली नाही याचे कोणतेही कारण अर्जात नमूद नाही. तसेच संभाव्य दुरुस्तीमुळे दाव्यात बदल होणारा आहे. सबब, अर्ज नामंजूर करावेत.

०४. वादीतर्फे वकील श्री. गिरकर, प्रतिवादींतर्फे वकील श्री. धामापूरकर यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींचे अन्य वकील युक्तिवादावेळी गैरहजर होते. वकील श्री. धामापुरकर यांनी आपल्या युक्तिवादापुष्ठयर्थ आदरणीय नामदार सर्वोच्च

न्यायालयाच्या **<u>विद्याबाई वि. पद्मलथा एआयआर २००९ सर्वोच्च न्यायालय, पृष्ठ क. १४३३</u>** येथील न्यायनिर्णयाचा आधार घेतला. त्यामध्ये असे सारसूत्र देण्यात आले आहे की, ज्या दिवशी वादप्रश्न निश्चित केले जातील त्या दिवसापासून दाव्याची चौकशी सुरु झाली असे मानावयाचे आहे. तसेच वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल झाल्यानंतर वादकथनात दुरुस्ती मागता येणार नाही. याउलट, वादीतर्फे वकील श्री. गिरकर यांनी असे कथन केले की, वादी पुर्वीची कोणतीही कबुली काढून घेत नाही उलट, तो प्रतिवादीचा हक्क कबूल करीत आहे. त्यामुळे संभाव्य दुरुस्तीमुळे दाव्यावर कोणताही विपरीत परिणाम होणारा नाही. त्यांनी माझे लक्ष फेरफार नोंद क्रमांक ८४०३ कडे वेधले आणि असे कनि केले की सदरच्या फेरफार नोंदीची पूर्ण जाणीव व कल्पना अगोदरच्या वकीलांना असतानाही त्यांनी चुकीचे वादकथन केले आहे. त्यामुळे त्याचा फटका पक्षकाराला बसू शकतो. त्यामुळे त्यांनी न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०५. दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. प्रतिवादींच्या वकीलांनी सादर केलेल्या आदरणीय नाम. सर्वोच्च न्यायालयाच्या सारसूत्राचे अवलोकन केले. एक बाब खरी आहे की, एकदा न्यायचौकशी सुरु झाली की योग्य व सक्षम कारणाखेरिज दुरुस्ती मंजूर करता येणार नाही. मी संभाव्य दुरुस्तीचे अवलोकन केले. तसेच फेरफार नोंद क्र. ८४०३ चे अवलोकन केले. त्यातून असे दिसून येते की दावा मिळकत स.क्र. ३४ हि. क्र. २० ही वादी प्रतिवादी क्र. १ ते ७ यांची वडीलोपार्जित मालकी वहिवाटीची असल्याचे दिसून येते. संभाव्य दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. तसेच मागितलेल्या दादीत जरी फरक पडणारा असला तरी आता वादी प्रतिवादींचा हक्क कबूल करीत असल्याने हक्कस्थापनेच्या दादीमध्ये फारसे तथ्य उरणार नाही. संभाव्य दुरुस्ती ही प्रतिवादींच्या हिताचीच आहे. वादींच्या वकीलांनी असे कथन केले की पुर्वीच्या वकीलांच्या चुकीमुळे वादकथन चुकीचे केले गेले. सदरची बाब विचारात घेता वकीलांच्या चुकीचा फटका पक्षकारांना देता येणार नाही. आदरणीय नाम. मुंबई उच्च न्यायालयाने **<u>हरी नारायणन विरुध्द विजय २०१२ (२) महा. विधी निर्णय, पृष्ठ क. १०६</u>** येथील न्यायनिर्णयात खालीलप्रमाणे सारसूत्र दिलेले आहे.

> “An amendment cannot be refused merely because of mistakes, negligence, inadvertence or even infraction of the rules of procedure. The Court always gives leave to amend pleading to the party unless it is satisfied that the party applying was acting mala fide or that by his blunder he had caused injury to his opponent which may not be compensated by an order of costs.”

०६. सदरचे सारसूत्र विचारात घेता वादींच्या चुकीचा किंवा अज्ञानपणाचा किंवा त्यांच्या वकीलांनी चुकीने केलेल्या वादकथनांचा फटका वादींना देता येणार नाही. तसेच वादींनी हेतुत: काही आगळीक केली असे दिसून येत नाही. सबब, वादीने प्रतिवादींना प्रत्येक अर्जापोटी रक्कम रुपये २५०/— तीन दिवसांत देण्याच्या अटीवर दोन्ही अर्ज मंजूर करण्यात येतात. वादीने दाव्यात तात्काळ दुरुस्ती करावी. दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी. जर वादीने मुदतीत रक्कम दिली नाही तर अर्ज नामंजूर झाला असे समजावयाचे आहे.

सही/—

दिनांक : २४.०३.२०१५ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मालवण